**ठळक बातम्या**

- डीएपी खतांवर प्रतिटन साडेतीनहजार रुपये विशेष अनुदान पुढं चालू ठेवण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

- शेतकऱ्यांच्या समृद्धी आणि  कल्याणासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्याचं प्रतिपादन

- गडचिरोलीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ताराक्कासह ११ जहाल नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- राज्यात दोन वेगवेगळ्या रस्ता अपघातात ८ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

डीएपी, अर्थात डायअमोनियम फॉस्फेट खतांवर प्रतिटन साडेतीनहजार रुपये विशेष अनुदान पुढं चालू ठेवण्याचा निर्णय आज केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. हा निर्णय पुढच्या आदेशांपर्यंत लागू राहील, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं. शेतकऱ्यांना डीएपी खताच्या ५० किलोच्या पोत्यावर १ हजार ३५० रुपये अनुदान मिळत राहील, त्याकरता केंद्रीय अर्थसंकल्पात तीन हजार ८५० कोटी रुपयांची तरतूद केली जाईल, असं ते म्हणाले. त्याकरता प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानाधारित पीकविमा योजनेला २०२५- २६ या आर्थिक वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाला. या योजनांवरची एकूण तरतूद एकोणसत्तर

हजार ५१५ कोटी रुपयांनी वाढवली आहे. या योजनेचे सुमारे ८८ टक्के लाभार्थी अल्पभूधारक आणि लहान शेतकरी आहेत. तसंच ५७ टक्के लाभार्थी इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतले आहेत. गेल्या ८ वर्षात लाभार्थी शेतकऱ्यांचे एक लाख सत्तर हजार कोटी रुपयांचे दावे मंजूर झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. नव्या वर्षातली ही पहिली मंत्रिमंडळ बैठक शेतकऱ्यांना समर्पित असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या समृद्धी आणि कल्याणासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळानं आज घेतलेल्या निर्णयांसंदर्भात त्यांनी सांगितलं, की देशासाठी अन्न पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचा देशवासियांना अभिमान आहे.

**<><><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवाकर संकलन, डिसेंबर महिन्यात गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ७ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांची वृद्धी नोंदवून १ लाख ७६ हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. डिसेंबर २०२३ मध्ये एकूण जीएसटी संकलन १ लाख ६४ हजार कोटी इतकं होतं. डिसेंबर २०२४ मध्ये केंद्रीय जीएसटी संकलन ३२ हजार ८३६ कोटी रुपये आणि राज्य जीएसटी संकलन ४० हजार ४९९ कोटी रुपये झालं. एकात्मिक जीएसटी संकलन ४७ हजार ७८३ कोटी रुपये झालं असून उपकर ११ हजार ४७१ कोटी रुपये इतका आहे.

**<><><><><>**

भारतीय हवाई दलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांनी आज पदभार स्वीकारला. लढाऊ विमानाचे वैमानिक म्हणून भारतीय हवाई दलात डिसेंबर १९८६ मध्ये ते रुजू झाले होते. ३८वर्षांच्या आपल्या सेवा कारकिर्दीत, एअर मार्शल मिश्रा यांनी महत्त्वाच्या विविध पदांवर काम केलं आहे. त्यांचे पूर्वसूरी पंकज मोहन सिन्हा यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला.

**<><><><><>**

राज्यात विविध उपक्रमांनी नववर्षाचं स्वागत झालं. विविध देवस्थानांवर नागरिकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. शिवसेनेच्या वतीनं ठाण्यात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहभाग घेत रक्तदान केलं. **धुळे** जिल्ह्यातही युवक बिरादरी आणि रक्ताशय संस्थेनं गेल्या ४१ वर्षांच्या परंपरेनुसार नववर्षाचं स्वागत करण्यासाठी रक्तदान शिबीर आयोजित केलं होतं. **नंदुरबार** शहरातल्या श्रॉफ हायस्कुलमधल्या विद्यार्थ्यांनी सामूहिक सूर्य नमस्कार घालून आरोग्य संपन्नतेचा संदेश दिला. सांगलीत काल रात्री लोकहित मंचानं सलग १८ व्या वर्षी “दारू नको दूध प्या” हा अभिनव उपक्रम राबवला.

**<><><><><>**

श्रोते हो, २०२४ या वर्षभरात आर्थिक क्षेत्रात घडलेल्या घडामोडींचा आढावा आज आपण ‘२०२४ च्या पाऊलखुणा’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेणार आहोत. रात्री सव्वा ७ वाजता अस्मिता वाहिनीसह, news on air हे ॲप आणि समाजमाध्यमांवर आपल्याला हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

गडचिरोलीत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत ११ जहाल नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. यात ८ महिला आणि ३ पुरुष आहेत. त्यांच्यावर राज्यात १ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची बक्षिसं असून, छत्तीसगड सरकारनंही त्यांच्यावर बक्षिस जाहीर केलं होतं.

यात दंडकारण्य झोनल कमिटी प्रमुख आणि भूपतीची पत्नीताराक्का, ३डिव्हिजन किमिटी मेंबर, १ उपकमांडर, तर ३ एरिया कमिटी मेंबर आहेत. या सर्वांना पुढचं जीवन जगण्यासाठी ८६ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली.

उत्तर गडचिरोली माओवादापासून मुक्त झाली, लवकरच दक्षिण गडचिरोली सुद्धा होईल, असं फडनवीस यांनी यावेळी सांगितलं. न्याय मिळायचा असेल तर भारतीय संविधानानंच मिळू शकतो, माओवादी विचारसरणीनं नाही, हे जनतेला आता पटलं आहे, असं ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी आज गडचिरोली जिल्ह्यात अहेरी ते गर्देवाडा या बससेवेचा प्रारंभ केला, तसंच लॉईडच्या विविध उपक्रमांचा प्रारंभही त्यांनी केला. यातून ६ हजार २०० कोटी रूपयांची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होत आहे, असं त्यांनी सांगितलं.

गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसंच ताडगुडा पुलाचं त्यांनी लोकार्पण केलं. पेनगुंडा इथं फडनवीस यांनी जवानांशी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. गडचिरोलीत ग्रीन माईनिंगचा प्रारंभही मुख्यमंत्र्यांनी केला.

**<><><><>**

भीमा कोरेगाव इथल्या विजय स्तंभ स्मारकाभोवती २०० जागा आणि २०० कोटी रुपयांचा निधी शौर्य स्तंभ स्मारकासाठी द्यावी, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. यासाठी लवकरच

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे ते म्हणाले. विजय स्तंभाला अभिवादन केल्यानंतर ते बोलत होते. मंत्रीमंडळातली रिक्त असलेली जागा, रिपब्लिकन पक्षाला द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

**<><><><><>**

पुण्याजवळ कोरेगाव भीमा या ठिकाणी आज दोनशे सातव्या शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाचं दर्शन घेण्यासाठी आज गर्दी झाली. नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभाला अभिवादन केलं. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही आज भीमा कोरेगाव इथल्या विजयस्तंभाला अभिवादन केलं. विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी लाखोंची उपस्थिती, हा संघर्ष जिवंत असल्याचं निदर्शक आहे, असं ते या वेळी म्हणाले.

**<><><><><>**

रत्नागिरीतल्या गोदूताई जांभेकर विद्यालयाला आज शंभर वर्षं पूर्ण झाली. केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या उपस्थितीत आज शताब्दी महोत्सवाचं उद्घाटन झालं. कोकणात स्त्री-शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या संस्थेविषयी अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून...

**व्हॉईस कास्ट- अनिकेत कोनकर**

*स्त्री-शिक्षण हा विषय क्रांतिकारी असण्याच्या काळात जनार्दन तथा बाबूराव जोशी आणि मालतीबाई या दाम्पत्याने रत्नागिरीत तीन मुलींसह महिला विद्यालयाचं बीज रोवलं. हालअपेष्टा सोसून त्यांनी घेतलेले अपार कष्ट आणि दूरदृष्टी यांमुळे या बीजाचा आज वटवृक्ष झाला आहे. १९३३ साली यातूनच रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. रूढ शिक्षणाबरोबरच संगीत, चित्रकला, शिवणकला, गृहशास्त्र असं वैविध्यपूर्ण शिक्षण या शाळेतून दिलं गेलं. प्रौढ निराधार, परित्यक्ता*

*आणि विधवा स्त्रियांसाठीही वर्ग सुरू करण्यात आले. १९६४ साली मालतीबाईंना तत्कालीन राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते गौरवण्यात आलं. शंभर वर्षांत १५ हजारांहून अधिक विद्यार्थिनी या शाळेने घडवल्या आहेत. या कार्याचा विस्तार आज रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या २२ शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून होत आहे. १९७३ साली गोदूताई जांभेकर यांचं नाव शाळेला देण्यात आलं.*

**<><><><><>**

राज्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या रस्ता अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला. सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट इथं ट्रक आणि स्कॉर्पिओच्या टकरीत, ४ जणांचा जागीच मृत्यू झाला तर किमान सात जण जखमी झाले. मृतांमधे दोन महिलांचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्यातील हे सर्व जण नववर्षाच्या पहिल्याच दिवशी देवदर्शनासाठी गेले होते. गंभीर रीत्या जखमी झालेल्यांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं आहे.

जालना जिल्ह्यातल्या महाकाळा फाट्याजवळ धुळे- सोलापूर महामार्गावर आज दुपारी झालेल्या अपघातात चारजणांचा मृत्यू झाला. अक्कलकोटहून येणाऱ्या गाडीने रस्त्यावर उभ्या असलेल्या नादुरुस्त ट्रकला धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत जखमी झालेल्यां दोघांवर उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

मुंबई शहरातलं वायू प्रदूषणाचं प्रमाण पूर्ण नियंत्रणात येत नाही तोपर्यंत ई विभागातल्या बांधकाम प्रकल्पांवरचे निर्बंध कायम ठेवण्यात येणार असल्याचं महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागानं एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवलं आहे. भायखळा परिसरात सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पांची पाहणी केल्यानंतर

महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी हे निर्देश दिल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यात भरड धान्य खरेदी अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणीची मुदत येत्या १५ जानेवारीपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नजीकच्या केंद्रामधून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असं आवाहन अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली.

येत्या दोन दिवसात, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**